महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महाज्योती

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

जावक क्र.महाज्योती/PHD/२०२३/ 2712 दि.१२.१२.२०२३

प्रति,
मा.कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणे.

विषय : पीएचडी अधिछात्रवृत्ती करिता होणारी दि.१७.१२.२०२३ रोजी होणारी संयुक्त CET पुढे ढकलण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर करण्यात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, (महाज्योती), नागपूर व छत्रपती शाहू महाराज संशोधन,प्रशिक्षण व मानव विकास संस्था, (सारथी), पुणे या तीनही संस्थांची पीएचडी अधिछात्रवृत्ती योजनेत उमेदवारांची निवड करण्याकरिता एकत्रित परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी रविवार दि.१७ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत आयोजित केलेली आहे.

मात्र दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेव्यतिरिक्त इतरही परीक्षा असल्याने विद्यार्थ्यांकडून परीक्षेचा दिनांक बदलण्याबाबत मोठ्या प्रमाणात मागणी या कार्यालयाकडे करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांची मागणी विचारात घेता दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी होणारी संयुक्त CET परीक्षा ही पुढे ढकलण्यात यावी तसेच संयुक्त CET परीक्षेचा पुढील दिनांक निश्चित करून या कार्यालयास कळविण्यात यावा, ही आपणास नम्र विनंती.

आपला विश्वासू,

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था, (महाज्योती), नागपूर.

प्रतिलिपी माहितीस्तव :

१) मा.व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे.
२) मा.महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण
व मानव विकास संस्था, पुणे
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

बालचित्रवाणी इमारत , गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

Email ID : sarthipune@gmail.com | CIN- U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502

जा.क्र. सारथी/ संशोधन विभाग/२०२३-२४/246 दिनांक:- १२/१२/२०२४

प्रति,

मा. कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे.

**विषय :- सारथी बार्टी व महाज्योती पीएचडी फेलोशिप संयुक्त सीईटी परीक्षा दिनांक १७ डिसेंबर २०२३ ऐवजी दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित करणेबाबत.**

**संदर्भ :- आपल्या सेट विभागाचे पत्र क्रमांक PU/SET/१९३ दिनांक २१/११/२०२३**

**महोदय,**

सारथी, बार्टी व महाज्योती PhD फेलोशिप संयुक्त CET सीईटी परीक्षा आपल्या विद्यापीठाच्या सेट विभागामार्फत घेणे संदर्भात आपल्या कार्यालयास यापूर्वी पत्र व्यवहार करणेत आला आला आहे.

संदर्भीय पत्रांन्वये आपण दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर व नागपूर या परीक्षा केंद्रांवर CET परीक्षा घेण्यासंदर्भात कळविले होते. त्यानुसार आपण विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेश पत्र सुद्धा ईमेलद्वारे पाठविलेले आहेत.

परंतू दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षे व्यतिरिक्त इतरही परीक्षा असल्याने परीक्षार्थी विद्यार्थी यांचे कडून परीक्षेचा दिनांक बदलण्याबाबत मोठ्या प्रमाणात मागणी सारथी, बार्टी महाज्योती या संस्थांकडे होत असल्याने आपणास विनंती करणेत येते की, दिनांक १७ डिसेंबर २०२३ रोजी होणारी संयुक्त CET परीक्षा ही पुढे ढकलून रविवार दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी घेण्यात यावी व त्यानुसार पुढील नियोजन करावे, ही विनंती.

**निबंधक,**
**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण**
**व मानव विकास संस्था (सारथी), पुणे.**

# महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)

*(विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त व महाराष्ट्र व गोवा शासन प्राधीकृत)*

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सेट भवन, गणेशखिंड पुणे,-४११००७.

दूरध्वनी क्र.: ०२० – २५६२२४४६
संकेतस्थळ : https://setexam.unipune.ac.in

फॅक्स क्र. : ०२० – २५६९१२५०
ई–मेल : set_coordinator@unipune.ac.in

सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा

**OW/2023/G/ 213** दि. १३/१२/२०२३.

प्रति,
मा. प्रकल्प संचालक,
छत्रपती शाहू महाराज संशोधन,
प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे.

विषय :– सारथी, बार्टी व महाज्योती पीएचडी फेलोशिप संयुक्त सीईटी परीक्षा दि. १७ डिसेंबर, २०२३ ऐवजी रविवार दि. २४ डिसेंबर, २०२३ रोजी आयोजित करणेबाबत.

संदर्भ :– आपले पत्र जा.क्र. बार्टी–पुणे/BANRF- अधिछात्रवृत्ती/२०२३–२४/६३५२, दि. १२/१२/२०२३.

महोदय,

आपले वरील संदर्भिय पत्र प्राप्त झाले. उपरोक्त संदर्भिय पत्र व विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपण कळविलेल्या तारखेस म्हणजे रविवार दि. २४ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी १० ते ११ परीक्षा घेणे शक्य आहे. त्यानुसार सेट विभागाने परीक्षेचे नियोजन केले आहे. सदर बाब विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी ही विनंती.

कळावे,

आपला,
13/12/2023
समन्वयक (सेट परीक्षा)

प्रत माहितीस्तव,

१. मा. विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन, प्रशिक्षण संस्था,(बार्टी),
२. मा. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन, प्रशिक्षण संस्था, (महाज्योती),